

# मेट्रो-३ : मुंबईच्या भूगर्भातील मेट्रोचे भुयारीकरण १०० टक्के पूर्ण

## ▌मुंबई सेंट्रल स्थानकातील अंतिम टप्पा पार पडला

▌**मुंबई** : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन अर्थात एमएमआरसीएलच्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गावरील मुंबई सेंट्रल स्थानकावर बुधवारी ४२ वा व प्रकल्पातील अंतिम भुयारीकरणाचा टप्पा पार पडला. या अंतिम टप्प्यानंतर मुंबईच्या भूगर्भातील मेट्रो ३ दरम्यानचे भुयारीकरण १०० टक्के पूर्ण झाले असल्याचे अधिकृत घोषित करण्यात आले आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या भुयारी मार्गातील अपलाइन मार्गावरील वरील या भुयारीकरणास एकूण ४३ दिवसांचा कालावधी लागला. यामध्ये ५५८ कॉंक्रीट रिंग्सचा वापर करण्यात आला. मेट्रो-३ मार्गातील सर्वात लांब मार्गिकेपैकी एक असलेल्या पॅकेज-३ मध्ये मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. पॅकेज-३ अंतर्गत महालक्ष्मी मेट्रो स्थानक ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकापर्यंतची ८३७ मीटरची सर्वात आव्हानात्मक भुयारीकरणाचे काम रॉबिन्सच्या टीबीएम तानसा-१ ने यशस्वीरीत्या पूर्ण केले.

आम्ही कामगारांच्या सुरक्षिततेशी तडजोड न करता आधुनिक तंत्रज्ञान वापरले. प्रकल्प सल्लागार कंत्राटदार, एमएमआरसीएलच्या संपूर्ण टीमसाठी हे एक जिकिरीचे काम होते. मेट्रो-३

बुधवारी मेट्रो-३ च्या भुयारी मार्गाचे काम १०० टक्के पूर्ण झाले. या क्षणाचे साक्षीदार होताना याचा मला अतिशय आनंद होत आहे. हा मार्ग मुंबईच्या ऐतिहासिक वारसा इमारती, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती, सध्याचा मेट्रो मार्ग, रेल्वे मार्ग, नदी व कठीण भौगोलिक रचना असलेला परिसर आदींच्या खालून व अगदी जवळून जात असल्याने मेट्रो-३ साठी भुयारीकरण करणे खूपच आव्हानात्मक होते,' असे मत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केले.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर मुंबईकरांना जलद, आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव मिळेल, असे मत एमएमआरसीएलचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी व्यक्त केले. मुंबई मेट्रो-३ या प्रकल्पाचे एकूण ७६.६ टक्के काम पूर्ण झाले आहे